२०१६०९३०१४३२०७१५०५

<u>राज्य क्रीडा धोरण -- २०१२</u>
शासकीय /निमशासकीय सेवेतील खेळाडूंच्या पालकांना रजा सवलती देण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन
## वित्त विभाग

शासन निर्णय क्रमांकः विरजा २०१२/२५८/प्र.क्र.१४/सेवा-६
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक : १३ ऑगस्ट, २०१३

<u>वाचा :</u> शासन निर्णय,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक: क्रीडाधो-२०११/प्र.क्र.५५/११/क्रीयुसे-१ , दिनांक १४ जून,२०१२.

**प्रस्तावना :**

राज्यात क्रीडा संस्कृतीचे संवर्धन, प्रचार, प्रसार व जोपासना करण्यासाठी पोषक वातावरण निर्माण करण्याच्या भूमिकेतून शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने "राज्याचे क्रीडा धोरण-२०१२" प्रस्तावातील शासन निर्णय दि.१४ जून, २०१२ अन्वये जाहीर केले आहे. सदर शासन निर्णयातील परिच्छेद क्र.५.२ (क) मध्ये खेळाडूंच्या पालकांना रजा सवलती देण्याबाबत तरतूद करण्यात आली आहे. सदर धोरणामध्ये नमूद केल्यानुसार अधिकृत राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धामध्ये सहभाग घेणाऱ्या अल्पवयीन, किशोरवयीन व महिला खेळाडूंच्यासोबत त्यांच्या पालकांना उपस्थित राहावे लागते. राज्यातील खेळाडूंचा राज्य, राष्ट्रीय,आंतरराष्ट्रीय खेळामध्ये खेळाडूंचा सहभाग वाढविण्याकरिता तसेच खेळस्पर्धामध्ये सहभागी होणाऱ्या खेळाडूंसोबत पालकांना उपस्थित राहाण्याची आवश्यकता विचारात घेऊन शासकीय/निमशासकीय सेवेतील पालकांना, अधिकृत राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धा मध्ये सहभाग घेणाऱ्या अल्पवयीन, किशोरवयीन व महिला खेळाडूं सोबत खेळस्पर्धादरम्यान उपस्थित राहण्यासाठी रजा सवलती देण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. याबाबत शासनाने सर्वकष विचार करुन आता खालील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

**२. शासन निर्णय :**

१) महाराष्ट्र खेळ परिषद किंवा अखिल भारतीय खेळ परिषद यांनी मान्यता दिलेल्या अधिकृत मंडळांनी/संघटनांनी आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धामध्ये सहभाग घेणाऱ्या अल्पवयीन, किशोरवयीन व महिला खेळाडूसोबत शासकीय, निमशासकीय सेवेतील

पालकांनी आंतरराष्ट्रीय खेळ स्पर्धा कालावधीत व्यतीत केलेला कालावधी तसेच त्यांनी केलेला जाण्या-येण्याचा प्रवासाचा कालावधी विशेष रजा म्हणून मंजूर करुन नियमित करण्यात यावा. राष्ट्रीय खेळासाठी अशा प्रकारची सवलत एका वर्षात १० दिवसापर्यंत मर्यादित राहील.

२) महाराष्ट्र खेळ परिषद किंवा अखिल भारतीय खेळ परिषद यांनी मान्यता दिलेल्या अधिकृत मंडळांनी/संघटनांनी आयोजित केलेल्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धामध्ये सहभाग घेणाऱ्या अल्पवयीन, किशोरवयीन व महिला खेळाडूसोबत उपस्थित राहणाऱ्या संबंधीत

३) शासकीय, निमशासकीय सेवेतील पालकांनी रजेची मागणी केल्यास त्यांना सर्वप्राथम्याने देय व अनुज्ञेय रजा देण्यात यावी.

४) क्रीडा स्पर्धांचे आयोजन अधिकृत असावे.

५) संबंधीत शासकीय/निमशासकीय कर्मचाऱ्यास पाल्य खेळाडूंसोबत खेळस्पर्धेदरम्यान उपस्थित राहण्यासाठी विभाग प्रमुखांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील.

६) ही सवलत शासन मान्य अधिकृत खेळ संघटनांच्या राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांना लागू राहील. मात्र निमंत्रित स्पर्धा, प्रशिक्षण शिबिरास उपस्थित राहण्यासाठी ही सवलत अनुज्ञेय ठरणार नाही.

७) रजा सवलतीसाठी खेळ स्पर्धेच्या अधिकृततेबाबत जिल्हा क्रीडा अधिकारी याचे प्रमाणपत्र तसेच खेळ स्पर्धा झाल्यानंतर खेळाडूंनी स्पर्धेत सहभागी झाल्याबाबतचे प्रमाणपत्र आवश्यक राहील.

८) ही सवलत अधिकृत स्पर्धेसाठी निवड होऊन प्रत्यक्ष सहभागी झालेल्या १८ वर्षे वयाखालील अल्पवयीन, किशोरवयीन व महिला खेळाडूंच्या शासकीय, निमशासकीय सेवेतील पालकांना अनुज्ञेय राहील.

९) या खेळाडूंसोबत जाणाऱ्या पालकाला त्यांचा सर्व खर्च स्वत: करावा लागेल.

१०) पती/पत्नी दोघेही शासकीय/निमशासकीय कर्मचारी असल्यास सदर सवलत केवळ एकालाच अनुज्ञेय राहील.

११) वरील सवलती शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या क्रमांक क्रीडाधो २०११/प्र.क्र.५५/११/क्रीयुसे-१, दि.१४ जून, २०१२ सोबतच्या परिशिष्ट-अ "राज्याचे क्रीडा धोरण-२०१२" मधील परिच्छेद ८.४ मध्ये नमूद केलेल्या गट-अ व गट-ब खेळासाठी लागू राहतील.

३. हे आदेश प्रस्तुत आदेशाच्या दिनांकापासून अंमलात येतील

४. हा शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.



एच-१७३३ -१अ

५.        सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३०८१३११५०३११२०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

NARAYAN BHASKAR RINGANE

Digitally signed by NARAYAN BHASKAR RINGANE
DN: CN = NARAYAN BHASKAR RINGANE, C = IN, S = Maharashtra, O = Government of Maharashtra, OU = Finance Department
Date: 2013.08.14 15:41:28 +05'30'

( ना.भा.रिंगणे )
शासनाचे उपसचिव

प्रत,

१. महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई
२. महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर
३. महालेखापाल-१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई
४. महालेखापाल-२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर
५. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
७. मुख्य लेखा परीक्षक (वरिष्ठ), स्थानिक निधी लेखा, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई
८. उपमुख्यलेखापरीक्षक,स्थानिकनिधीलेखा,मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/ अमरावती
९. वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे/औरंगाबाद/नागपूर/नाशिक
१०. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
११. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१२. विधानमंडळाचे सर्व सदस्य
१३. मा.राज्यपालांचे सचिव
१४. मा.मुख्यमंत्र्यांचे सचिव
१५. मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव
१६. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
१७. प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई
१८. प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई
१९. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई

२०. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
२१. प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मादाम कामा मार्ग, मुंबई
२२. मुख्य माहिती आयुक्त, मुंबई
२३. आयुक्त, राज्य माहिती आयोग, (सर्व)
२४. सचिव, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर, मुंबई
२५. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई (२५ प्रती)
२६. सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
२७. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
२८. संचालक, क्रिडा व युवक सेवा, पुणे
२९. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग
३०. विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली
३१. मंत्रालयाच्या निरनिराळया विभागाच्या अधीन असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयाचे प्रमुख
३२. सर्व विभागीय आयुक्त
३३. सर्व जिल्हाधिकारी
३४. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
३५. कुलसचिव,महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी, जि.अहमदनगर
३६. कुलसचिव,मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी
३७. कुलसचिव,कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जि.रत्नागिरी
३८. कुलसचिव,पंजाबराव कृषि विद्यापीठ,अकोला
३९. कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ,लोणेरे, जिल्हा रायगड
४०. बहुजन समाज पार्टी, डी-१, इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई १ (५ प्रती)
४१. भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ. बॅरॅक नं.१, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईट, मुंबई २० (५ प्रती)
४२. भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभुवन,एस.व्ही.पटेल रोड,मुंबई ४०० ००४ (५ प्रती)
४३. भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई १३ (५ प्रती)
४४. इंडियन नॅशनल कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई २५ (५ प्रती)
४५. नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईट, मुंबई २१ (५ प्रती)
४६. शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई- २८. (५ प्रती)
४७. महाराष्ट्र नवनिर्माण सेना, मातोश्री टॉवर, दुसरा मजला, पद्माबाई ठक्कर मार्ग, शिवाजी पार्क, मुंबई-१६ (५ प्रती)
४८. वित्त विभागातील सर्व कार्यासने
४९. निवड नस्ती, वित्त विभाग (सेवा-६)

-----------